अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपील क्र.६९/२०२३

जा.क्र उआ (सा.प्र.)/ आस्था/६७९ दि.१८/०९/२०२३

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त , सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/६९/२०२३

प्रति,

श्री.अभिषेक दत्तात्रय खेडेकर
वास्तुश्री फ्लॅट नं-०१, यश प्लॅटिनम सोसायटी समोर
धायरी-नऱ्हे रोड, धायरी
पुणे-४११०४१

यांस

---------------- अपिलार्थी

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

श्री.अभिषेक दत्तात्रय खेडेकर, वास्तुश्री फ्लॅट नं-०१, यश प्लॅटिनम सोसायटी समोर, धायरी-नऱ्हे रोड, धायरी, पुणे-४११०४१ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी आ.क्र.७०२६, दि.१९/०७/२०२३ अन्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज प्राप्त झाला आहे.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/४५६६, दि.२५/०७/२०२३ अन्वये अर्जास माहिती दिलेली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| १९/७/२०२३ | १९/७/२०२३ | १८/८/२०२३ | २५/७/२०२३ | ० |

अपिलार्थी यांनी मागितलेली आवश्यक माहिती समाधानकारक प्रतिसाद व मागितलेली माहिती न मिळाल्याने अपिल सुनावणी घेणेकामी दि.२२/८/२०२३ रोजी (आ.क्र.८७८० दि.२२/८/२०२३) रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| २२/८/२०२३ | २२/८/२०२३ | २४/८/२०२३ | होय | -- |

अपिल दिनांक ०१/०९/२०२३ रोजी सकाळी ११.३० वा. सुनावणी आयोजित करण्यात आली होती. अपिलार्थी यांना दूरध्वनीवरुन सुनावणीस उपस्थित राहणेबाबत दि.३१/८/२०२३ रोजी दुपारी ४.०० वा.कळविण्यात आले होते. श्री.अभिषेक खेडेकर यांनी अॅड.चैतन्य घाडगे (एमएएच ४५००/२०२२) यांना सदर अपिलाकरिता वकीलनाम लिहून दिलेला आहे. सुनावणीस अपिलार्थी श्री.अभिषेक खेडेकर तसेच त्यांचे वकील अॅड.चैतन्य घाडगे व जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी ,आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते.

**विवेचन**

अपिलार्थी यांनी "श्रीमती शिल्पा रविंद्र आढाव यांनी सदरचे अपिलार्थी यांच्या विरोधात २९/९/२०२२ रोजी केलेला तक्रार अर्ज, तक्रारी संदर्भात झालेली चौकशी, जाब-जबाब व त्याप्रित्यर्थ देण्यात आलेली माहिती, तक्रार अर्जावर प्रशासन यांनी देण्यात आलेले आदेश व करण्यात आलेली कारवाई यांची माहिती मिळणेबाबत", अपिल अर्जात नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग पुणे महानगरपालिका यांनी अर्जास जा.क्र.जमाअ/आस्था/४५६६, दि.२५/७/२०२३ रोजीचे पत्रान्वये दिलेले उत्तर व अपिलार्थी यांचे लेखी म्हणणे पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | मागितलेली माहिती | उपलब्ध माहिती |
|---|---|---|
| १ | शिल्पा रविंद्र आढाव यांनी अर्जदार नामे अभिषेक दत्तात्रय खेडेकर यांच्या विरोधात दि.२९/६/२०२२ रोजी आपल्याकडे तक्रारी अर्ज दिला होता. त्यावर आपल्याकडे झालेले सदर अर्जाबाबत जाब-जबाब त्या संदर्भात त्यांनी दिलेले पुरावे व त्यासंदर्भातील आपण केलेला आदेश व कारवाई हे सर्व लिखीत स्वरुपात मिळावे ही नम्र विनंती. | अंतर्गत तक्रार समितीचे कामकाज पूर्णपणे गोपनिय व इन कॅमेरा चालते या समितीचे कामकाजाची माहिती उपलब्ध करुन देणाऱ्यास शिक्षा करण्याची तरतूद "महिलांचे कामाचे ठिकाणी लैंगिक छळ व प्रतिबंध मनाई कायदा २०१३ चे कलम १६ व १७ मध्ये नमूद करण्यात आलेली आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे. सबब, आपण मागणी केलेल्या निर्णयाच्या प्रती उपलब्ध करुन देता येणार नाहीत. |

ॲड.चैतन्य घाडगे यांनी श्री.अभिषेक खेडेकर यांची माहिती ही वैयक्तिक असून माझ्या अशिलाची स्वत:ची असल्याने त्यांना मिळावी. कायद्याप्रमाणे माझे अशिल हे कोणत्याही प्रकारचे प्रसिद्धी माध्यम प्रेस मिडीया नाहीत, सबब त्यांना त्यांचे कागदपत्र मिळविण्याचे अधिकार आहेत. सदर अभिलेखे हे अंतर्गत महिला तक्रार निवारण समितीचे असून ती गोपनीय स्वरूपाची आहेत. तरी अपिलार्थी यांनी सदर माहितीसाठी अंतर्गत तक्रार निवारण समितीकडे अर्ज करणे आवश्यक आहे. सदर विवेचनाअंती पुढील प्रमाणे आदेश पारित करणेत येत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी दिलेली माहिती योग्य आहे. त्यानुसार, सदर अपिल क्र.६९/२०२३ निकाली काढण्यात येत आहे.

18/9/23

(सचिन इथापे)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत/-
जन माहिती अधिकारी,
आस्थापना विभाग,
पुणे महानगरपालिका.